राज्य माहिती आयोग, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ या कार्यालयात प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या श्रीमती मनिषा परदेशी, सहायक कक्ष अधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः प्रतिनि २५२२/प्र.क्र.५२/प्रशा-३(१४-अ)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १९ ऑक्टोबर, २०२६.

वाचा : १) या विभागाचे समक्रमांकाचे आदेश, दि. १७.०३.२०२२.
२) या विभागाचे समक्रमांकाचे आदेश, दि. ०५.०६.२०२४.
३) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्रमांक साप्रवि-१२०२२/१४/२०२५-माहिती (कक्ष-६) दि. १८.०३.२०२६.

## शासन आदेश

संदर्भाधीन क्र. १ येथील दिनांक १७.०३.२०२२ च्या आदेशान्वये श्रीमती मनिषा परदेशी, सहायक कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय यांच्या सेवा २ (दोन) वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने राज्य माहिती आयोग, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ या कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. त्यानुसार श्रीमती परदेशी ह्या दिनांक २६.०४.२०२२ पासून राज्य माहिती आयोग, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत. श्रीमती परदेशी यांचा ०२ वर्षाचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक २५.०४.२०२४ रोजी संपुष्टात आल्यानंतर या विभागाच्या संदर्भाधीन क्र. २ येथील दि. ०५.०६.२०२४ रोजीच्या आदेशान्वये श्रीमती परदेशी यांच्या प्रतिनियुक्तीस दि. २६.०४.२०२४ पासून २ वर्षासाठी म्हणजेच दि. २६.०४.२०२४ ते दि. २५.०४.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. **श्रीमती परदेशी यांच्या प्रतिनियुक्तीचा एकूण ४ वर्षाचा कालावधी दि. २५.०४.२०२६ रोजी संपुष्टात आलेला आहे.**

२. संदर्भाधीन क्र. ३ येथील दि. १८.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सामान्य प्रशासन विभाग/कक्ष-६ यांनी श्रीमती परदेशी यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही २०११/प्र.क्र.१३७/का.१२, दिनांक १७.१२.२०१६ अन्वये प्रतिनियुक्तीचे धोरण निश्चित करण्यात आले असून, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही २०१६/प्र.क्र.५१०/का.१२, दिनांक १६.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अटी व शर्ती आणि नियुक्तीची कार्यपध्दती याबाबतच्या धोरणामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील परि.५ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे:-

“परि.क्र. ५(अ) (३) :- प्रतिनियुक्ती प्रथमत: ३ वर्षासाठी देण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्याची इच्छुकता व संवर्ग नियंत्रण विभागाचे सहमतीने हा कालावधी चौथ्या वर्षाकरिता वाढविण्यात यावा. परंतु चार वर्षांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर आणखी एक वर्षासाठी म्हणजेच ५ व्या वर्षासाठी मुदतवाढ द्यावयाची झाल्यास मा. मुख्यमंत्री यांची विनिर्दिष्टपणे मान्यता घेण्यात यावी. ५ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ अनुज्ञेय राहणार नाही.”

४. परिच्छेद ३ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार **श्रीमती मनिषा परदेशी, सहायक कक्ष अधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीस दि. २६.०४.२०२६ पासुन पुढे ०१ वर्षासाठी म्हणजेच दि. २६.०४.२०२६ ते दि. २५.०४.२०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.**

५. प्रतिनियुक्ती संदर्भातील सर्व अटी व शर्ती संदर्भाधीन क्र. १ च्या शासन आदेशात नमूद केल्याप्रमाणे असतील. **श्रीमती परदेशी यांच्या प्रतिनियुक्तीसंदर्भातील सदर मुदतवाढ ही अंतिम स्वरूपाची असून, त्यांना यापुढे कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.** तसेच त्यांना मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव पुन्हा राज्य माहिती आयोग, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ यांनी या विभागाकडे सादर करू नये. दि. २५.०४.२०२७ रोजी प्रतिनियुक्तीच्या मुदतवाढीचा कालावधी समाप्त होताच त्यांच्या सेवा त्यांच्या मूळ विभागात परत करण्यात याव्यात.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१९१७३०४८४८०७ असा आहे. सदर शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

GAJANAN SAHADEO PARAB

Digitally signed by GAJANAN SAHADEO PARAB
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT, 2.5.4.20=23BC53B7F4F1CA24AD7FDD55B639979816E6E784D75D5396D0F50367308ECC8B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6E3168FC30A0E07A9B8D13F2A24C658F97BA49C1AB3A023B1606696C22202DDD, cn=GAJANAN SAHADEO PARAB
Date: 2026.10.19 17:32:08 +05'30'

**(ग.स.परब)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

श्रीमती मनिषा परदेशी, सहायक कक्ष अधिकारी **(राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर कार्यालयामार्फत)**

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. सचिव, राज्य माहिती आयोग, मुख्यालय, १३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर, मुंबई-३२.
३. उपसचिव, राज्य माहिती आयोग, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१.
३. सहसचिव/उपसचिव (आस्थापना), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सहसचिव/उपसचिव, (कार्यासन-माहिती (६)),सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सा.प्र.वि./प्रशा-३ (१४-अ) (संग्रहार्थ)